जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 APR 2025
लोकमत

# अकरा लाखांची देणगी

**कोल्हापूर :** राजाराम महाविद्यालयातील प्रा. डॉ. शोभना जाधव यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यासाठी त्यांचे पती अशोक जाधव यांनी गुरुवारी शिवाजी विद्यापीठास ११ लाखांची देणगी दिली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे धनादेश सुपूर्द केला. सूक्ष्मजीवशास्त्र विषयात पदवीस्तरावर सर्वोत्कृष्ट गुणवत्तापूर्ण कामगिरी बजावणाऱ्या दोन विद्यार्थिनी व एक विद्यार्थी यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 APR 2025
सकाळ


# शाश्वत विकासाद्वारे राष्ट्रनिर्मितीत युवकांनी योगदान द्यावे : सिद्धार्थ शिंदे

## विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक्स विभागात व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : शाश्वत विकासाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मिती करण्याच्या कामी युवकांनी योगदान द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी आज येथे केले.

विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागात ई-कचरा व्यवस्थापन केंद्राद्वारे 'शाश्वत विकास' या विषयावर शिंदे यांचे विशेष व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभाग प्रमुख डॉ. पवन गायकवाड होते. तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात शाश्वत विकासाकडे लक्ष द्यायला हवे. इलेक्ट्रॉनिक्स विषयाच्या विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाच्या अनुषंगाने संशोधन करण्याच्या अनेक संधी उपलब्ध असून, त्यांनी त्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. शैक्षणिक संस्थांनी जास्तीत जास्त विद्यार्थीकेंद्री धोरणे अवलंबण्याची आवश्यकता असल्याचे शिंदे यांनी सांगितले. डॉ. गायकवाड यांनी शाश्वत विकास हा दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक असल्याचे सांगितले. संजीवनी कदम यांनी सूत्रसंचालन केले. ई-कचरा व्यवस्थापन केंद्राचे समन्वयक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी आभार मानले.



कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात बोलताना सिद्धार्थ शिंदे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 APR 2025

पुण्यनगरी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'शाश्वत विकास' या विषयावर बोलताना सिद्धार्थ शिंदे. सोबत मान्यवर.

# राष्ट्रनिर्मितीत युवकांनी योगदान द्यावे : शिंदे

**कोल्हापूर :** शाश्वत विकासाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मिती करण्याच्या कामी युवकांनी योगदान द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी केले. विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागात ई-कचरा व्यवस्थापन केंद्राद्वारे 'शाश्वत विकास' या विषयावर शिंदे यांच्या विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अधिविभागप्रमुख डॉ. पवन गायकवाड अध्यक्षस्थानी होते. शिंदे म्हणाले, तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात शाश्वत विकासाकडे लक्ष द्यायला हवे. इलेक्ट्रॉनिक्स विषयाच्या विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाच्या अनुषंगाने संशोधन करण्याच्या अनेक संधी उपलब्ध असून, त्यांनी त्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. यावेळी शिंदे यांनी ई-कचरा व्यवस्थापन केंद्राची पाहणी केली. संजीवनी कदम यांनी सूत्रसंचालन केले. ई-कचरा व्यवस्थापन केंद्राचे समन्वयक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी आभार मानले.

04 APR 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रनिर्मितीत युवकांनी योगदान द्यावे

## राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांचे आवाहन


प्रतिनिधी
कोल्हापूर

शाश्वत विकासाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मिती करण्याच्या कामी युवकांनी योगदान द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी केले.

विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागात ई–कचरा व्यवस्थापन केंद्राद्वारे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'शाश्वत विकास" हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अधिविभाग प्रमुख डॉ. पवन गायकवाड अध्यक्षस्थानी होते.

शिंदे म्हणाले, तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात शाश्वत विकासाकडे लक्ष द्यायला हवे. इलेक्ट्रॉनिक्स विषयाच्या विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाच्या अनुषंगाने संशोधन करण्याच्या अनेक संधी उपलब्ध असून त्यांनी त्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. शैक्षणिक संस्थांनी जास्तीत जास्त विद्यार्थीकेंद्री धोरणे अवलंबण्याची आवश्यकताही त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षस्थानावरून डॉ. गायकवाड यांनी शाश्वत विकास हा दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक असल्याचे सांगितले. यावेळी शिंदे यांनी ई–कचरा व्यवस्थापन केंद्राची पाहणी केली. संजीवनी कदम यांनी सूत्रसंचालन केले. ई–कचरा व्यवस्थापन केंद्राचे समन्वयक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे. सोबत डॉ. पवन गायकवाड, डॉ. मुरलीधर भानारकर.**

04 APR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘देवचंद’ची क्रीडा विभागात उत्तुंग भरारी

## डॉ. बनसोडे; वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण उत्साहात

नानीबाई चिखली ता. ३ : ‘देवचंद महाविद्यालयाने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार खेळाडू देऊन क्रीडा विभागात ठसा उमटवलेला आहे. ग्रामीण भागातील महाविद्यालयाची ही यशाची परंपरा निश्चितच उत्तुंग भरारी घेण्यासाठी बळ देणारी आहे,’ असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे यांनी केले.




**अर्जुननगर : येथील देवचंद महाविद्यालयात वार्षिक क्रीडा पारितोषिक समारंभप्रसंगी बोलताना डॉ. शरद बनसोडे. यावेळी संस्थाध्यक्ष आशिष शाह, प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे आदी.**

अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयात वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष आशिष शाह होते. उपप्राचार्य डॉ. पी. पी. शाह, कनिष्ठ विभागाच्या उपप्राचार्या एस. पी. जाधव, पर्यवेक्षक डॉ. अशोक डोनर, जिमखानाप्रमुख डॉ. रवींद्र चव्हाण उपस्थित होते. प्रा. बनसोडे म्हणाले, ‘खेळाडूंची खरी स्पर्धा स्वतःशीच असून, जागतिक स्तरावर खेळाडूंना नावलौकीक मिळवायचा असल्यास प्रबळ इच्छाशक्ती, प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची क्षमता, आत्मविश्वास आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असायला हवे. ज्या विद्यार्थ्यांना आज बक्षीस देऊन कौतुक केले, त्यांना नवीन स्पर्धेसाठी ऊर्जा आणि प्रेरणा मिळेल.’ प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी क्रीडा शिक्षक निरंजन जाधव, विद्यार्थी प्रतिनिधी इंद्रजित कापडे, प्रा. नामदेव मधाळे, प्रा. सागर परीट, प्रा. विनायक कुंभार, प्रा. सदानंद झळके, प्रा. प्रशांत कुंभार उपस्थित होते. डॉ. सुजाता पाटील, प्रा. कृष्णामाई कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. डी. शिरगावे यांनी आभार मानले.

### विद्यार्थ्यांचा सत्कार

■ नंदिनी साळुंखे, स्वाती शिंदे यांना शिवछत्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल, तर धनंजय बडवे, आकाश वाडकर, प्रथमेश यादव हे अग्निवीर म्हणून सैन्य दलात भरती झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. भूमिका मोहिते, अंकित खुरपे, प्रीतम चव्हाण, अक्षय फडतरे, गजानन शिंगाडे, शुभांगी खामकर, सना किल्लेदार, प्रेमकुमार पाटील, निहाल तहसीलदार यांनी राष्ट्रीय स्पर्धेत नैपुण्य दाखविल्याबद्दल त्यांचा पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 APR 2025
सकाळ



मलकापूर : प्रा. एन. डी. पाटील महाविद्यालयात झालेल्या वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात बोलताना प्रा. रणधीर शिंदे.

# डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

मलकापूर : संपूर्ण जग कृत्रिम बुद्धिमत्तेकडे वळत असताना संवेदनशीलता, विवेकवादी दृष्टी, भावना व माणुसकी बोथट होता कामा नये, याची दक्षता घ्यायला हवी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातील प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. येथील प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी. जी. पवार होते. प्राचार्य पवार म्हणाले, 'आजच्या काळात कौशल्याधारित शिक्षण खऱ्या अर्थाने संपत्तीचा खजिना आहे. विद्यार्थ्यांनी ते आत्मसात करावे.' विकास समितीचे सदस्य सुहास पाटील यांनी स्मार्ट काम करणे व अपडेट राहणे सध्या काळाची गरज आहे, असे सांगितले. यावेळी प्रा. सचिन चव्हाण, प्रा. क्षितिज खरात, प्रा. विजय रानमाळे, प्रा. स्वप्नाली लाड, डॉ. संतोषकुमार पोरे, डॉ. चंद्रकांत गिरी, डॉ. नामदेव आडनाईक, डॉ. मकरंद ऐतवडे, डॉ. जयवंत इंगळे, डॉ. सत्यवान बनसोडे, प्रा. सुहास वाघ यांचा सत्कार झाला. डॉ. आर. बी. खबाले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. प्रमोद नाईक यांनी आभार मानले.